“ भारतीय स्वातंत्र्य लढयातील महाराष्ट्रातील निवडक स्त्रियांचे योगदान एक ऐतिहासिक अवलोकन ”

सामाजिक शास्त्रे विद्याशाखेच्या इतिहास विषयाच्या पीएच.डी. (Ph.D.) पद्वीसाठी सादर करण्यात येणाऱ्या प्रबंधाचा आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
अंतर्गत

संशोधक

बावनकर रवि रामकृष्णाजी

एम.ए.,(इतिहास)

मार्गदर्शक

डॉ. यु.एस.सावंत

(एम.ए., बी.एड्., एम.फिल., पीएच.डी.)

विभाग प्रमुख

पदव्युत्तर इतिहास व संशोधन विभाग,

यशवंत महाविद्यालय, नांदेड.

इ.स. - २०१८

विषय प्रवेश

प्राचीन मध्ययुगीन व आधुनिक काळात जो इतिहास घडला आणि जो आज आपल्या पुढे मांडल्या गेला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने बहुतांशी पुरुषांच्या कर्तबगारीवरच प्रकाश टाकण्याचा प्रयत्न झाला आहे. समाजकारण, अर्थकारण, प्रशासन, राजकारण या वेगवेगळया क्षेत्रातील पुरुषाचे कर्तृत्व प्रकाशात आणले गेले. भारतीय इतिहासात स्त्री ही केवळ "चुल आणि मुल" या दृष्टचक्रामध्ये अडकविली गेली आणि इतर क्षेत्रात तिच्या कर्तृत्वाला मज्जाव केला गेला आहे. असे पदोपदी वाचायला मिळते. याचाच अर्थ या काळामध्ये समाजातील स्त्री हा घटक संपुर्णतः दुर्लक्षित गेला आहे असे जाणवायला लागते. मग कुटुंब या संस्थेच्या बाहेर जावून शिक्षण घेणे, समाजकारण करणे, उदयोग व्यवसाय करणे, राजकारणात भाग घेणे, प्रशासनात उच्च पदे भुषविणे इत्यादी बाबतीत स्त्रिला वावच नव्हता आणि म्हणूनच तिचा विकास संपुर्णतः खुंटला की काय ? अशी शंका मनात आल्याशिवाय राहत नाही.

भारतदेश हा मुळचा स्त्री हुतात्म्यांचा देश होता. प्राचीन काळात स्त्रीला हवे असणारे स्वातंत्र्यही होते. भारतात अनेक स्थ्यितंत्तरे झाली. ही स्थितंत्तरे सामाजिक, राजकीय, प्रादेशीक, धार्मिक या चळवळीतून झालेली आहे. विशेषत : स्त्री जीवनाचा विचार करतांनाही राजकीय स्थित्यंतराचा विचार करावाच लागतो. भारत हा दैववादी आणि संकुचित मानसिक प्रवृत्तीचे प्रतिनिधित्व करणारा देश बनला. अश्या या मनोवृत्तीच्या देशामध्ये व अंधश्रध्देच्या बेगुमान काळात इस्लामी राजसत्ता भारतात आली. दैववाद व अंधश्रध्दा यांना अधिकच चालना मिळाली. मुसलमान राज्यकर्ताच्या काळात स्त्रिला कवडीमोल केले गेले व स्त्री गुलाम बनली. भारतीयांच्या मानसीकेतवर या प्रवृत्तीचा प्रभाव दिर्घकालीन म्हणजेच आतापर्यंत आहे.

प्राचीन काळाचा विचार करता वैदीक काळात यज्ञयाग, राजदरबार आणि समारोहात स्त्री आवश्यक असे कारण याशिवाय ती समारोह संपन्न होत नसत. विवाहानंतर स्त्रिचे स्थान सर्वात मोठे होते आणि पती-पत्नीची एकमेकांवरची अविचल निष्ठा हे आदर्श जीवनाची नोंदही वैदीक काळाने केलेली आहे. गार्गी, मैत्रेयी, लोपामुद्रा, उचला, लोपा, रुदूतंभरा या स्त्रिया देखील वेदविद्येत पारंगत होत्या आणि पतीबरोबर युध्दात सहभागी होत असत. भारतीय संस्कृतीत वेदकाळात स्त्रियांना प्रतिष्ठा होती. धर्मकारण, राजकारण, ज्ञान आणि समाजकारण या सर्वात तिला पुरुषाइतकेच

प्राधान्य होते. मनुस्मृती मध्ये मुनच्या भूमिका विषम दिसून येतात. स्त्रीच्या जीवनाची इतिकर्तव्यता परवश राहण्यात आहे. पती हा तीचा मुख्य मालक त्यापूर्वी पिता आणि पतीच्या निधनांतर पुत्र असे कुणाच्या तरी ताब्यात स्त्रीने राहिले पाहिजे. स्त्रीने स्वतंत्रता बाळगु नये.

मध्ययुगीन काळामध्ये धर्मधितेचे महत्व अधिक वाढल्यामुळे जातीभेद, वर्णभेद यांच्या चरम सिमेला समाज पोहचला होता आणि या काळात घराला पडदा, विधवा विवाह निषेध यामुळे स्त्रिच्या जीवनाची कुंचबना अधिकच भयावह झाली होती. मध्ययुगीन काळ हा स्त्रीयांच्या दृष्टीने अतिशय शुद्र असा काळ आहे. शुद्रापेक्षाही वाईट जीवन या काळात स्त्रीच्या वाटयाला या काळात आले होते. स्त्री ही या काळात भोगवस्तू झालेली होती. ज्या समाजामध्ये विधवा विवाहाचा निषेध केला जातो त्या समाजात त्या काळात गणिका, नगरवधू, देवदासी, वेश्या अश्या समाज रचनेचा जन्म झाला होता. म्हणून या काळामध्ये स्त्री ही वेगवेगळया रुपाने सगळयांची दासी झाली.

इंग्रजांनी व्यापारानिमित्त भारतात प्रवेश केला आणि जगण्याच्या साधनामधून व व्यवहारातून त्यांचे संबंध भारतीयांशी झाले. १८१८ मध्ये पेशवाई संपुष्टात आली. इंग्रजांनी भारतावर आपले पुर्ण साम्राज्य प्रस्तापित केले. १९ व्या शतकापर्यंत सामान्य प्रचलित मत असे होते की, मुलींनी पुढील आयुष्यात नौकरी करावयाची नसून संसार करावयाचा आहे. तेंव्हा दिलेले शिक्षण संसारोपयोगी असले पाहिजे. त्यानुसार अभ्यासक्रमात बदल झाला. त्यामुळे तत्कालीन परिस्थितीत पंडीता रमाबाई, न्या. रानडे, काशिबाई कानिटकर यांनी स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन दिले व येथुनच खऱ्या अर्थाने स्त्रियांच्या उत्कर्षाला प्रारंभ झाला. या काळात ब्रिटीश व भारतीय समाज सुधारकांच्या प्रयत्नामुळे अनेक सुधारणा झाल्या. शिक्षणाच्या संदर्भात १८१८ मध्ये कलकत्ता येथे "तरुण सभेची " स्थापना झाली. १९३७ हिंदु वारसा हक्क कायदा, १९३० शारदा कायदा, १८७२ विधवा विवाह कायदा त्यामुळे त्यांच्यात आत्मसन्मान निर्माण होण्यास मदत झाली व त्याचा परिणाम असा झाला की महिलांमध्ये शिकण्याची प्रेरणा जागृत झाली.

पुढे टिळक युगाचा शेवट व गांधी युगाचा आरंभ या पार्श्वभूमीवर अनेक सुधारणा झालेल्या होत्या. महिलांनी विविध क्षेत्रात पदार्पण करण्यास प्रारंभ केला होता. यामध्ये स्त्रिया मोठया प्रमाणात राजकीय भारतीय स्वातंत्र्य लढयात सहभाग होवू लागल्या. गांधीजींनी स्त्रीयांना समान न्यायाने स्वातंत्र्य लढयात पुढे येण्यासाठी प्रेरणा दिली. आपल्या १८ कलमी कार्यक्रमातही

त्यांनी महिला विकासावर भर दिली. महिला व पुरुषांना समान अधिकार व स्वतंत्र दयावे असे त्यांचे मत होते. याचाच परिणाम म्हणजे त्यांची सविनय कायदेभंग चळवळ, सत्याग्रह यामध्ये मोठया प्रमाणात स्त्रीयांना सहभागी करुन घेतले.

भारताच्या इतिहासात ज्या महाराष्ट्रीय कर्तबगार स्त्रियांनी आपल्या गुणवत्तेच्या आणि कर्तबगारीच्या जोरावर जो भारतीय स्वतंत्र लढा टिकवून ठेवण्यात जे दैदीत्यमान यश मिळवले त्या कर्तबगार स्त्रियांच्या बाबतीत फारसे संशोधन झाले नव्हते. भारतीय इतिहासात भारतीय स्वातंत्र्य लढयाला अन्यन्य साधारण महत्व आहे. १८५८ ते १९४७ पर्यंत म्हणजे स्वातंत्र्यापर्यंत ज्या थोर पुरुषांनी आपले योगदान दिले त्यांची कामगिरी आता सुपरिचीत झालेली आहे. पण भारतीय स्वातंत्र्यासाठी व संवर्धनाशी महाराष्ट्रातील ज्या थोर स्त्रियांनी योगदान दिले त्यांच्या कार्यावर अजुनही म्हणावा तेवढा प्रकाश पडलेला नाही.

ब्रिटीशांचे भारताला अधिक काळ गुलाम बनविण्याचे स्वप्न देखील भारतीय स्त्रियांनी आपल्या कर्तबगारीने त्यांनी हाणुन पाडले. सन १९२० ते १९४७ या कालखंडात इंग्रजांशी संघर्ष करीत असतांना या संघर्षात आपल्या बहूसंख्य उपस्थितीने लाखमोलाची कामगिरी त्यांनी बजावली. यात सर्व स्त्रियांचे कर्तृत्व मोठे होते. त्यामुळे या स्त्रियांचा बारकाईने अभ्यास करुन त्यांनी भारतीय स्वातंत्र्य लढयात नेमके कोणते योगदान दिले याचा अभ्यास करणे अत्यंत गरजेचे वाटते.

या स्त्रियांचा अभ्यास हा केवळ त्यांच्या वैयक्तीक जीवनाचा अभ्यास नसून तो स्वातंत्र्य लढयाच्या स्थित्यंतराचा, चढ-उताराचा, आव्हानांचा, संकटाचा, परिवर्तनाचा आणि या स्त्रीयांनी त्यावर समर्थपणे, मात करण्याचा जो प्रयत्न केला आहे. म्हणजेच या कर्तबगार स्त्रियांचा अभ्यास हा वेगळया पध्दतीने भारतीय सत्तेच्या विविध कालखंडात व भारतीय राजकारणात त्या कश्या सफल झाल्या याची प्रचिती देणारा आहे.

समस्या सुत्रण :-

या अभ्यासामध्ये स्त्रीला कन्या, पत्नी, माता, बहिण या भूमिकांमुळे स्वतंत्र व्यक्ती म्हणून अनुभवाचा अभ्यास केला जातो अशा स्त्री केंद्रीत दृष्टीकोणातून स्त्री जीवनाचा अभ्यास हे १९७० च्या दशकाचे फळ असले तरीही भूतकाळातील घटनांसाठीही हा दृष्टीकोन वापरुन इतिहास विषयक

लिखाणाचे पुनर्लेखन केले जाऊ शकते. इतिहास विषयातील अभ्यासामुळे स्त्रियांना आजपर्यंत मिळालेल्या वागणूकीबद्दल वाचा फोडता येते. आहार, आरोग्य, निर्णय स्वातंत्र्य या हक्काबद्दल स्त्री कुटूंबात दुर्लक्षीत का राहते याचा सांगोपांग विचार अश्या अभ्यासातून होतो. इतिहासात आजपर्यंत स्त्रि ही पडदयामागे का राहीली. स्त्रीयांना इतिहासकारांनी का डावलले ? या सर्व प्रश्नांची उकल या अभ्यासातून होवू शकते. स्वातंत्र्य चळवळीत स्त्रीयांना सहभाग घेतांना कोणत्या समस्यांना तोंड दयावे लागले. त्याचे योगदान याची तुलना का केली जाते. या सर्व प्रश्नाची उत्तरे आपणाला या अभ्यासातून साकारता येवू शकते. स्त्रियांची मते ही पुरुषापेक्षा वेगळी असू शकतात. पण समाजात पुरुषाच्या मताला अधिक मान्यता दिली जाते. स्त्रियांच्या दृष्टीकोणातूनही वास्तवता समजावून घेतल्यावर स्त्रीयांच्या योगदानाच्या अभ्यासात फरक पडू शकतो. वेगवेगळया विषयांच्या अभ्यासातून स्त्रीयांच्या सहभागाविषयी त्यांच्या कार्याविषयी पुरावे व ज्ञान उपलब्ध होते. ते एकत्रित करुन त्याचे संघटन व विश्लेषण होण्यासाठी या अभ्यासाची आवश्यकता आहे. भारतीय स्वातंत्र्यासाठी महाराष्ट्रातील महिलांनी केलेल्या निस्वार्थ व त्यागी स्त्री जीवनाचा संशोधन पध्दतीने अभ्यास करणे. भारतीय इतिहासातील स्त्रीयांचे योगदान व प्रभाव इत्यादीचा अभ्यास करतांना महाराष्ट्राच्या ऐतिहासिक स्त्री जीवनाचे धाडसी, पराक्रमी, औदार्य, शालीनता इत्यादी गुणांचा दुर्मिळ कागदपत्राद्वारे अभ्यास करतांना महाराष्ट्रातील स्त्री स्वातंत्र्य सेनानी व क्रांतीकारी महिलांच्या जीवनातील घटनांचा मागोवा घेणे.

संशोधनाची उद्दीष्टये :-

हया संशोधन प्रकल्पाच्या अभ्यास मागचा उद्देश म्हणजे भारतीय स्वातंत्र्य लढयातील महाराष्ट्रातील स्त्रियांचे योगदान (१८५८ ते १९४७) हा असला तरी खालील मुद्दयावर चर्चा करण्यात आली.

१) भारतीय स्वातंत्र्य लढयातील महाराष्ट्रातील निवडक स्त्रियांचे योगदान (सहभाग) तपासत असतांना त्यांचा स्वातंत्र्य लढयात कटकारस्थानाशिवाय राजकारणात सहभाग हा सक्रीय होता की फक्त कटकारस्थानापुरता सिमीत होता याचा अभ्यास.

२) सत्ताधारी घराण्यातील स्त्रियांनी राजकारण, लष्करी व सामाजिक चळवळीत बजावलेल्या भूमिकांचा अभ्यास करण्यात येईल.

३) हया अभ्यासातून अनेक दुर्लक्षित परंतू कर्तबगार स्त्रियांच्या कामगिरीवर प्रकाश टाकण्यात येईल.

४) पुरुष प्रधान संस्कृतीत स्त्रिया हया नेहमीच दुय्यम राहिल्या आहेत. पण शोषित-अंकीत वर्गाच्या अभ्यास करुन एका अर्थाने सर्वसामान्यांचा इतिहास [Subaltern Study] मांडण्याचा प्रयत्न केला जाईल.

५) वेगवेगळया विषयाच्या अभ्यासातून स्त्रीयांविषयीच्या सहभागाविषयी त्यांच्या कार्याविषयी पुरावे व ज्ञान उपलब्ध होते ते एकत्रित करुन त्यांचे संघटन व विश्लेषण होण्यासाठी या अभ्यासाची गरज आहे.

६) आधुनिक कालखंडाचा स्त्रीवादी दृष्टीकोणातून अभ्यास करुन भारतीय स्वातंत्र्य लढयात महाराष्ट्रातील स्त्रियांचे योगदान यांच्या इतिहासाचे पुनर्लोखन करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

संशोधनचे महत्व :-

समाजाचा विकास विशिष्ट अंगानी होत असतो. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात चांगल्या रुढी बरोबर काही वाईट कालबाहय व अनिष्ट अश्या परंपरा देखील आजपर्यंत सुरु आहे. तेंव्हा अश्या समाजाच्या विकासासाठी अनेक देशांनी अनेक प्रयत्नांच्या प्रयत्नांची पराकाष्टेची गरज असते. देशाचे पुनरुध्दाराचे कार्य करण्यासाठी अनेक थोर महात्मे व स्त्रियांचा जन्म झाला. यामध्ये देशाच्या जडणघडण कार्यात नवराष्ट्र निर्मितीच्या महान कार्यात यांच्या आदर्शाची मदत होईल.

अशा थोर महिला स्वातंत्र्य सेनानी व क्रांतीकारी प्रसंगी आपल्या जीवनाला तिलांजली देवून देशाच्या स्वातंत्र्य लढयात विशिष्ट ध्येयाने झपाटून दुर्दम्य अश्या अवघड व काटेरी वाटेने प्रवास करत शेवटी आपले ध्येय पुर्णत्वास नेले. अश्या असामान्य महिलांचे जीवन पुढील पिढीला प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरेल.

हजारो वर्षापासन महिला आपल्या अधिकारापासुन वंचित राहिल्या आहे. याची कारणे व परिणाम याचा अभ्यास भारतासारख्या देशात होणे महत्वपुर्ण आहे. कारण भारताचा अभ्यास म्हणजेच संपुर्ण जगाचा अभ्यास आहे. महिलांच्या सबलीकरणाची प्रक्रीया ही पाश्चात्य देशात १९ व्या शतकामध्येच सुरु झाली होती. मात्र तिला म्हणावे तेवढे यश मिळत नव्हते. यानंतर भारतातही याचा प्रवाह सुरु झाला तरीही त्या सबलीकरणास तयार होत नव्हत्या. यासाठी त्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी या स्त्रियांचा अभ्यास करणे महत्वपुर्ण आहे.

१९९० च्या दशकात भारतात महिलांच्या बाबतीत अनेक क्रांतीकारी बदल करण्यात आले. त्यामध्ये महिलांचे योगदान राजकीय, स ामाजिक क्षेत्रात वाढावे, महिला नेतृत्वाला वाव मिळावा. भारतीय स्वातंत्र्य लढयावर अनेक इतिहासकारांनी व संशोधकांनी सखोल अभ्यास केला. त्यात मोलाची कामगिरी केली. परंतू महाराष्ट्रातील ज्या स्त्रीयांनी भारतीय स्वातंत्र्य लढयात आपले योगदान दिले. त्यावर पाहिले तसे लिखाण झाले नाही किंवा सखोल, व्यापक स्वरुपाचे संशोधन झाले नाही.

स्वातंत्र्य लढयाचे महान कार्य करणाऱ्या महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिक, महिला व क्रांतीकारी यांच्या कार्याची व त्यांच्या संशोधनाची माहिती इतिहासात अभ्यास करणाऱ्या व संपुर्ण समाजास होणे आवश्यक आहे. कारण जोपर्यंत आपण जे स्वातंत्र्य उपभोगत आहो. त्यासाठी स्वातंत्र्य सैनिकांनी व क्रांतीकारांनी जे रक्त वाहीले त्याची किंमत समाजाला कळणार नाही तोपर्यंत स्वातंत्र्याचा अर्थ (महत्व) कळणार नाही त्यादृष्टीने प्रेरित होवून हा हेतू समोर ठेवून प्रस्तुत संशोधन करणे महत्वाचे आहे.

संशोधनाची गृहितके :-

स्वातंत्र्य काळातील स्त्रीयांचा सहभाग काही प्रमाणात निश्चित असायला पाहिले काही स्त्रियांचे उल्लेख तर आपणाला मिळतात पण -

१) त्या स्त्रिया उल्लेखापुरत्याच हा सहभाग मर्यादीत होता का ?

२) अनेक स्त्रियांचे उल्लेख कदाचित कागदपत्रातून दुर्लक्षित अवस्थेत राहणार.

३) स्त्री ही तसे म्हटले तर समाजातील सामान्य घटक, सामान्यांचा इतिहास शोधायचा तर तो तळागळातून शोधावा लागेल. सुक्ष्म पातळीवर शोधावा लागेल.

४) त्या दृष्टीने भारतीय स्वातंत्र्य लढयातील महाराष्ट्रातील स्त्रीयांचे योगदान यात शोधले गेले.

५) भारतीय समाजात, सामाजिकदृष्टया स्त्रियांना राजकारणापासून किंवा बाहेरील जगापासून दुर ठेवले तरीही व समाजाने वेगवेगळे निर्बंध घातले तरी या काळातील कांही स्त्रिया पराक्रमाने व कर्तृत्वाने ऐतिहासिक ठरल्या आहे.

६) भारतात स्त्री सैध्दांतीक व व्यावहारीक धारणा परस्पर विरोधी राहिल्या आहेत. येथील प्रमुख धार्मिक संस्कृतीच सर्वसामान्य स्त्रियांचे हजारो वर्षापासुन शोषण होत आहे.

७) प्राचीन व मध्ययुगीन काळात महाराष्ट्रातील स्त्रियांना आपले कर्तृत्व दाखविण्याच्या अनेक संधी मिळत गेल्या व स्त्रियांनी आपले प्रमुख सर्व क्षेत्रात सिध्द करुन दाखविले आहे.

८) महाराष्ट्रात पारतंत्राच्या काळातच स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी विशेष प्रयत्न झालेले दिसतात याचा परिणाम म्हणून स्त्रियांचा स्वातंत्र्य लढयातील सहभाग लक्षनिय ठरला.

९) सर्वसामान्य स्त्रियांना शिक्षणाच्या माध्यमातून या स्त्रियांचे ज्ञान देवून व त्यांच्या आत्ममानाची जागृती घडवून आणुनच खऱ्या अर्थाने स्त्रिचे सामाजिक, राजकीय सबलीकरण साध्य होणार आहे.

१०) आजच्या युवा तरुणीसमोर भारतीय स्वातंत्र्य लढयातील स्त्रियांचा आदर्श घेणे ही काळाची गरज आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-

सैध्दांतिक दृष्टीने भारतीय स्वातंत्र्य लढयातील महाराष्ट्रातील निवडक स्त्रियांचे योगदान (१८५८ ते १९४७) : एक ऐतिहासिक अवलोकन हा अतिशय व्यापक विषय आहे. या अभ्यासात सामाजिक, राजकीय, धार्मिक असे अनेक आयाम आहे. यात केवळ एकाच आयामाचा अभ्यास करुन परिस्थितीचे पुर्ण आकलन शक्य न झाल्यास आवश्यक तेथे आवश्यक घटकांचीही संदर्भ घेतल्या जाईल. भौगोलिक व्याप्तीच्या दृष्टीकोणातून महाराष्ट्राचा या प्रादेशिक भागाचा सर्व साधारण अभ्यास केला जाईल.

संशोधन अभ्यासामध्ये महाराष्ट्रातील स्त्रियांच्या भारतातील स्वातंत्र्य लढयातील योगदान याचा अभ्यास व त्याचा राजकीय सामाजिक, धार्मिक इत्यादी बाबींचाही यात अभ्यास करण्यात येईल हे पाहण्याचे निश्चित करुन संशोधन विषयाची मर्यादा खालील प्रमाणे.

सदरील संशोधन अभ्यास पुर्ण करतांना वेळ व तदनुषंगिक मर्यादा पडल्यामुळे वरील अनुच्छेदात नमुद केलेल्या व्यक्तीचाच विचार केल्या जाईल. तर संशोधनास विषयाचे स्वरुप विचारात घेता ठळकपणे जाणवलेल्या मर्यादा. संशोधनाची पार्श्वभूमी व महत्व विषद करतांना प्रमुख संशोधन विषयाशी संबंधीत जरी अनेक घटकांचे विवेचन केले असले तरी संशोधनास उपलब्ध साधन व सोईनुसार व आपल्या आर्थिक कुवतीनुसार शक्य तेवढे अधिकाधिक घटकाबद्दल

माहिती मिळवण्याचा प्रयत्न केल्या जाईल. या संशोधनास मिळवलेली माहिती त्या स्त्रीयांच्या कार्यावर इतरांनी लिहिलेले ग्रंथ संपदांचा अभ्यास, निरीक्षण व मुलाखती इत्यादीच्या माध्यमातून असतील. त्यावर आधारीत निष्कर्ष काढल्या जाईल.

संशोधन पध्दती :-

भारतीय स्वातंत्र्य लढयातील महाराष्ट्रातील निवडक स्त्रियांचे योगदान (१८५८ ते १९४७) : एक ऐतिहासिक अवलोकन हा विषय आधुनिक कालखंडातला आहे. या विषयाच्या संशोधनासाठी ज्या काही ऐतिहासिक संशोधन पध्दती आहेत. त्यापैकी संदर्भ संशोधन पध्दतीचा वापर करुन त्यामध्ये विश्लेषणात्मक पध्दतीचा अधिक प्रमाणात वापर करण्यात येईल.

प्रस्तुत विषयाच्या संदर्भ संशोधन पध्दतीचा वापर केला जाणार असला तरी विषयाच्या अनुषंगाने संशोधन पारदर्शी, सखोल व विस्तारित व्हावे यासाठी आवश्यकता असेल त्या ठिकाणी जेष्ठ संशोधकांच्या मुलाखती सुध्दा घेण्यात येणार आहे.

हि संशोधन प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी आधुनिक भारतीय इतिहासाची पुस्तके, महाराष्ट्राच्या इतिहासाची पुस्तके, वृत्तपत्रे, मासिके व इतर संदर्भ ग्रंथाचा अभ्यास करण्यात येईल. तसेच राज्य पुराभिलेखागारातील कागदपत्राचा यांचाही कार्यात उपयोग केला जाणार आहेत.

संशोधनाची प्राथमिक साधने :-

प्रस्तुत संशोधन हे प्रामुख्याने प्राथमिक सामुग्रीवर अवलंबुन असेल. अनुसुचीच्या माध्यमातुन प्राथमिक तथ्यांचे संकलन केले जाणार आहे. सदर संशोधनातील प्राथमिक तथ्य, संकल्पनासाठी संशोधनाच्या उद्देश व स्वरुपावरुन ऐतिहासिक संशोधन पध्दती अंतर्गत विश्लेषणात्मक सर्वेक्षण पध्दतीचा वापर येईल. यामध्ये प्रामुख्याने ज्या महाराष्ट्रातील निवडक महिला की ज्यांनी स्वातंत्र्य लढयात आपले योगदान दिले यांची माहिती अनुसुचीच्या माध्यमातून संकलीत केली जाईल.

संशोधनाची दुय्यम साधने :-

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक साधने सामुग्री बरोबरच दुय्यम सामुग्रीही एक महत्वाचा आधार आहे. यामध्ये मध्य संकलनासाठी दुय्यम सामुग्रीचाही वापर केला जाईल. याप्रमाणे प्रकाशितव अप्रकाशित अश्या दोन्ही लेखी सामुग्रीचा वापर करण्यात येईल. यात प्रामुख्याने विविध शासकीय अहवाल, विविध शैक्षणिक अहवाल, विशिष्ट वर्षाचे अहवाल, वर्तमानपत्रे, मासिके, नियतकालीके, ग्रंथ, परिषद व चर्चा सत्रातील शोधनिबंध, संबंधित विषयावर झालेले यापूर्वीची संशोधन इत्यादी माहितीचा उपयोग केल्या जाईल.

संशोधन आराखडा प्रारंभ

प्रस्तावना :

प्रकरण पहिले :

भारतीय स्वातंत्र्य लढयातील महाराष्ट्रातील मवाळगटवादी स्त्री.

१) काशिताई कानिटकर

प्रकरण दुसरे :

भारतीय स्वातंत्र्य लढयातील महाराष्ट्रातील जहालगटवादी स्त्री.

१) यमुनाताई भावे उर्फ रुक्मीणीताई बापट

प्रकरण तिसरे :

भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील महाराष्ट्रातील क्रांतीकारी महिलेचे योगदान.

१) लीला पाटील

प्रकरण चौथे :

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील महाराष्ट्रातील गांधीवादी महिलेचे योगदान.

१) अनुसया काळे

निष्कर्ष :

प्रस्तावना

२० व्या शतकातील स्त्रीयांचा राजकीय जीवनात सहभाग हा भारतीय इतिहासात व विशेषतः भारतीय स्त्रीयांच्या इतिहासात एक महत्वपूर्ण टप्पा मानावाच लागतो. १९ व्या शतकातील हाताळलेला स्त्री समस्या व होणारे बदल यातून स्त्रियांनी एकनिष्ठेने व कार्यक्षमतेने भारतीय स्वातंत्र्य लढयात महाराष्ट्रातील स्त्रियाने या लढयात महत्वपुर्ण कार्य करत मोठया तत्परतेने योगदान दिले. यानंतर गांधीजींच्या प्रेरणेने वरिष्ठ वर्गापासुन सामान्य वर्गातील स्त्रीया राजकारण व समाज जीवनाच्या विधायक कार्याकडे वळल्या क्रांतीकारी चळवळी, सत्याग्रह, असहकार चळवळ, संप, मोर्चे इत्यादी अनेक मार्गांनी स्त्रीयांचा राजकीय जीवनाशी परिचय झाला. क्रांतीकारी चळवळीत काही स्त्रीयांनी पुरुषाबरोबर कार्य केले व सहभाग घेतला.

इ.स. १५ ऑगस्ट १९४७ नंतर भारत सार्वभौम राष्ट्र म्हणून जगाच्या नकाशावर मानाचे स्थान अधोरेखीत केले. १८८५ ते १९४७ हा भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा गौरवशाली कालखंड म्हणून उल्लेखावा लागतो. प्रदीर्घ सांस्कृतिक परंपरा लाभलेला, वैविध्यातूनही एकता शोधणारा विस्तीर्ण अज्ञान, दारिद्रय, विषमता यामुळे पोखरलेला असुनही चिवटपणे ब्रिटीशांना अहिंसात्मक मार्गाने आव्हान देणारा भारत हा देश जगातील एकमेव उदाहरण आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही सर्वात मोठी चळवळ होती. त्यात लाखो स्त्री - पुरुषांनी सहभाग घेतला. जात-पात, उच्च-निचता विसरुन एकत्र आले. त्यामुळे साम्राज्यवादी ब्रिटिश सत्तेला माघार घेणे भाग पडले. यात पुरुषा प्रमाणे भारतातील सर्वच भागातून स्त्रीयांनी आपला सहभाग नोंदविला त्यातही महाराष्ट्रातील स्त्रीयाही कुठेही कमी नव्हत्या त्यांचे मोलाचे योगदानही या लढयात लक्षणीय ठरले. म्हणूनच त्यांच्या कार्यावर संशोधनात्मक प्रकाश टाकणे गरजेचे वाटते.

प्रकरण पहिले

भारतीय स्वातंत्र्य लढयातील महाराष्ट्रातील मवाळगटवादी स्त्री :

या प्रकरणात आपण काँग्रेसची स्थापना १८८५ मध्ये झाली यात सुरुवातीच्या काळात काँग्रेस पक्षावर गोपाळकृष्ण गोखले, दादाभाई नौरोजी यासारख्या मवाळवादी नेत्याचे वर्चस्व होते. काँग्रेसच्या सुरुवातीच्या काळात या पक्षात स्त्रियांचा सहभाग हा नगण्य होता. तरी ज्या काळातील काही गणमान्य स्त्रियांनी सामाजिक, विषमतेपोटी यात याला काही प्रमाणात विरोध करण्यासाठी यात सहभाग दर्शविला. यात सुरुवातीच्या काळात या क्षेत्रातील काशीताई कानिटकर यांच्या कामगिरीवर संशोधनात्मक प्रकाश टाकणार आहोत.

प्रकरण दुसरे

भारतीय स्वातंत्र्य लढयातील महाराष्ट्रातील जहालगटवादी स्त्री :

प्रस्तुत प्रकरणात १९०५ ते १९२० या काळात आपणाला जहालमतांच्या नेत्याचा प्रभाव काँग्रेस पक्षावर दिसून येतो. या काळात लोकमान्य टिळक, बिपिनचंद्र पाल व लाला लचपत राय यांचे या काळात या पक्षावर वर्चस्व होते. या काळात महाराष्ट्रातील अतिशय कमी स्त्रियांनी या पक्षाच्या कार्यात सहभाग नोंदविला. कारण जहालमत हे बऱ्याचदा पुरुषीपणात जास्त असतो. तो स्त्रियात नसलयाने त्यांनी यात आपली नापसंती दर्शविली. तरी सुध्दा काही जहालमतवादी स्त्रिया आपणाला पहायला मिळतात त्यातल्याच यमुनाताई भावे उर्फ रुक्मीणीताई बापट यांच्या योगदानाचा अभ्यास यातून करावयाचा आहे.

प्रकरण तिसरे

भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील महाराष्ट्रातील क्रांतीकारी महिलेचे योगदान :

भारतीय स्वातंत्र्य लढयात ज्या प्रमाणे स्वातंत्र सैनिक, चळवळी, संप, मोर्चे या मार्गातून किंवा आवेदन अर्ज या मार्गाने स्त्रीयांनी स्वातंत्र्य चळवळीत आपले योगदान दिले. त्याच प्रमाणे काही स्त्रियांनी भारताला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी या शांततेचा मार्ग न पत्कारता त्यांनी सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने देशाला स्वातंत्र्य करण्याचा मार्ग पत्कारत त्यांनी बॉम्ब हल्ले, बंदूकीचा मार्ग पत्करला व पुरुष क्रांतीकारकांच्या खांदयाला खांदा लावून त्या लढल्या. यातीलच एक क्रांताकारी महिला लीला पाटील यांच्या कार्यावर प्रकाश टाकावयाचा आहे.

प्रकरण चौथे

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील महाराष्ट्रातील गांधीवादी महिलेचे योगदान.

भारतीय स्वातंत्र्य लढयात गांधीजींचा सहभाग व त्यांनी जो अहिंसक मार्गाने देशाला स्वातंत्र्य करण्याची चळवळ उभारली यात त्यांना जगाच्या इतिहासात तोड नाही. यात त्यांनी आपल्या लढयात मोठया प्रमाणात स्त्रियांना सहभागी करुन घेतले. यात स्त्रियाही संप, मोर्चे, धरणे या माध्यमातून त्यांनी मोलाचे कार्य केले व लढा पुढे नेण्यास त्यांनी मोलाची कामगिरी केली. यातच अनुसयाबाई काळे यांच्या कार्याचा आढावा या प्रस्तुत प्रकरणात करावयाचा आहे.

निष्कर्ष

वरील संशोधनात आराखडया प्रमाणे संशोधन करुन या आधारावर निष्कर्ष संपादीत करण्यात येईल.

विषयाचे पुर्वसंशोधन :

प्रस्तुत संशोधित विषयासंबंधी अनेक विद्वानांनी संशोधन केले आहे पण ते या संशोधन प्रकल्पापेक्षा वेगळे आहे.

प्रस्तुत संशोधन आराखडा हा पुर्णतः प्राथमिक स्वरुपाचा असुन भविष्यात यामध्ये काही बदल करणे आवश्यक वाटल्यास तसा बदल करण्यात येईल.

संशोधक
बावनकर रवि रामकृष्णाजी
एम.ए. (इतिहास)

मार्गदर्शक
डॉ. यु. एस. सावंत
एम.ए.,बी.एड्.,एम.फील.,पीएच.डी.
विभाग प्रमुख
पदव्युत्तर इतिहास व संशोधन विभाग
यशवंत महाविद्यालय,नांदेड.

संदर्भ ग्रंथ

विनया खडपेकर	:	स्त्री स्वातंत्र्यवादिनी, विसाव्या शतकातील परिवर्तन, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९११
रोहिणी गव्हाणकर	:	मराठी स्त्री शक्तीचे राजकारणी रुप, आदित्य प्रकाशन, पुणे १९८६
डॉ.बा.अ.देशपांडे	:	महाराष्ट्राच्या कर्तृत्वशालिनी, पुणे १९९४
नंदीता शहा	:	स्त्री संघर्षाची नवी रुपे, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९९४
मेघा नानीवडेकर	:	महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा मागोवा, प्रतिमा प्रकाशन पुणे, १९८८
सरिता पत्की	:	आधुनिक महाराष्ट्रातील प्रमुख विचारवंताचे स्त्रीजीवनाविषयक विचार, स्त्री अभ्यासकेंद्र पुणे विद्यापीठ, मार्च १९८७
पद्मजा पाटील	:	डॉ.इंदुमती नाईक - एक क्रांतीकारी, मालती प्रकाशन मानगाव, २००४
लीला पाटील	:	भारतीय स्त्री जीवन, मेहता प्रकाशन पुणे, १९९०
पंडीता रमाबाई	:	स्त्री धर्मनीती, १९०३
डॉ.विद्युत भागवत	:	महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाच्या दिशेने स्त्री अभ्यासकेंद्र, पुणे विद्यापीठ, १९९७
कमल भागवत	:	स्त्री चळवळीची वाटचाल, प्रागतीक पुस्तक प्रकाशन पुणे, १९८५
माया सरदेसाई	:	महाराष्ट्राच्या सौदामिनी, पुणे १९८४
पि.एस.साने	:	भारतीय नारी, साधना प्रकाशन पुणे, १९६७
रोहिणी गव्हाणकर	:	भारतीय महिला एवं आजादी की लढाई, मुंबई गांधी स्मारक निधी, मुंबई १९९८
एस.एल.नागोरी	:	भारतीय स्वतंत्रता आंदोलन में महिलाओंका योगदान, सुरभी प्रकाशन जयपूर, १९९७
आशारानी व्होरा	:	महिलाएँ और स्वराज्य, सुचना और प्रसार मंत्रालय, प्रसार विभाग, भारत सरकार दिल्ली, १९८८
डॉ.पद्मजा पाटील	:	भारतीय इतिहासातील स्त्रिया : फडके प्रकाशन, कोल्हापूर
डॉ.माधव पोतदार	:	महाराष्ट्रातील लढे व लढवये, अनुबंध प्रकाशन पुणे
तारा धर्माधिकारी	:	स्वातंत्र्य लढयातील स्त्री, ऑगस्ट क्रांती मोहत्सव समिती, मुंबई

स्वप्नील सारस्वत	:	भारतीय राजनीती और महिलाएँ, अक्षरांकन प्रकाशन नोएडा, २००३
डॉ.विमल भालेराव	:	आधुनिक मराठी वाङःमयातील स्त्रियांची आत्मचरित्रे : एक अध्ययन (१९१० - १९७५) नागपूर
मिनाक्षी फडणीस	:	मृत्यूंजयाच्या सावलीत
डॉ.मोहीनी कडू	:	भारतीय राजकारणातील स्त्रिया (चरित्रे-आत्मचरित्रे) २००८
बिपीन चंद्र	:	भारत का स्वतंत्रता संघर्ष (हिंदी माध्यम कार्यान्वय निर्देशालय दिल्ली विश्वविद्यालय)